महाराष्ट्र टाइम्स

## आर्थिक आव्हानांचा डोंगर

दरवर्षी अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी सादर होणारा आर्थिक पाहणी अहवाल देशाच्या विकासातील अडचणींचा आलेख मांडत असतो. यंदाचा अहवाल हा मोदी सरकारच्या मांडल्या जाणाऱ्या पहिल्या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारच्या लोकानुनयाला जागा नसल्याचेच अधोरेखित करत आहे. त्यावरूनच केंद्र सरकारपुढे संपूर्ण वर्षभर विकासाला चालना देताना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे, याची स्पष्टता येते. सन २०१३-१४मध्ये ४.७ टक्के राहिलेला विकासदर यंदा २०१४-१५ मध्ये ५.४-५.९ टक्क्यांवर जाऊ शकतो, हा आशावाद अहवालाने दाखवलेला आहे; पण, तो वास्तवात उतरेलच असे नाही. कारण, एकाचवेळी सरकारी तूट आटोक्यात आणणे, महागाई नियंत्रणात ठेवणे, उद्योगांना चालना देणे, गुंतवणूकदारांना आश्वस्त करणे, सुधारणांचा कार्यक्रम राबवणे अशा अनेक आघाड्यांवर एकत्रित परिणाम साधावा लागणार आहे. महागाई कमी झाली असली तरी ती रिझर्व्ह बँकेच्या आणि अर्थमंत्रालयाच्या पूर्णपणे पकडीत आलेली नाही. त्यामुळे व्याजदर कमी करण्यास फारसा वाव नाही. अहवालातच हे स्पष्टपणे नमूद केल्याने महागाईविरोधातील लढाईत गव्हर्नर रघुराम राजन आणि अर्थमंत्री अरुण जेटली हे दोघेही एकत्र असल्याचे दिसते, ही चांगली बाब म्हणायला हवी! राजन यांना पतधोरण ठरवताना पुरेसे स्वातंत्र्य मिळू शकेल असे दिसते. उद्योगांना व्याजदरात कपात अपेक्षित असली तरी त्याहूनही त्यांच्यासाठी महत्त्वाची आहे ती धोरणात्मक स्पष्टता. भूसंपादन, पर्यावरणासंदर्भातील परवाना प्रक्रिया कशी आणि किती वेगाने होऊ शकेल? वेगवेगळ्या क्षेत्रांतील एफडीआयची मर्यादा किती वाढवली जाईल? घोटाळ्यांमुळे आणि कोर्टकचेऱ्यांमुळे रखडलेल्या खाण क्षेत्रांतील उलाढालींबाबत सरकार काय निर्णय घेणार? अशा अनेक सुधारणाविषयक प्रश्नांवर दिशा मिळणे उद्योगांना गरजेचे वाटत आहे. या मुद्द्यावर पाहणी अहवालाने बोट ठेवले आहे. पायाभूत सुविधांचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आर्थिक सुधारणांना गती दिली पाहिजे, हा पाहणी अहवालातील निष्कर्ष गेले काही महिने अनेक स्तरांवर अनेक तज्ज्ञांनी मांडलेला आहे. मोदींच्या अर्थसंकल्पात त्यादृष्टीने काय पावले उचलली जातात, याकडे उद्योगांचे लक्ष लागलेले आहे. अहवालातील प्रकर्षाने लक्ष द्यावा असा मुद्दा आहे, तो वाया जाणाऱ्या अनुदानाचा. अत्यंत गरीब असणाऱ्या दहा टक्के व्यक्तींच्या तुलनेत दहा टक्के श्रीमंतांना सवलतींचा सातपट अधिक फायदा मिळाला असल्याने सवलती 'वाया' गेल्याचेच अनुमान काढण्यात आले आहे. सरकारी तूट आटोक्यात आणण्याचा निकाराचा प्रयत्न गेले वर्षभर करावा लागलेला असताना हजारो कोटींचे अनुदान मात्र, यूपीए सरकारने फुकट घालवलेले आहे. त्यावर उपाय म्हणून 'थेट रोख रक्कम' देणारी अनुदानाची पद्धत कायम ठेवण्याची शिफारस अहवालात केली आहे. याचा अर्थ, मोदी सरकारला 'आधार'ची फेररचना तातडीने करावी लागणार आहे. कर वाढवण्यापेक्षा कररचनेत बदल करून करवसुलीचा परीघ विस्तारण्यावरही अहवालात भर देण्यात आला आहे. त्याचे सूतोवाच जेटली यांनीही राज्यसभेत केल्यामुळे 'वस्तू व सेवा कर' लागू करण्याची घोषणा अर्थसंकल्पात केली जाऊ शकते. मोदी सरकारने सकारात्मक निर्णय घेतले तरी मान्सून किती दगा देणार आणि इराक युद्धासारखी बिकट स्थिती कितपत त्रास देणार यावर मोदी सरकारसमोरील आर्थिक आव्हानांचा डोंगर किती मोठा होईल हे ठरणार असल्याचा इशारा पाहणी अहवालाने दिलेला आहे.



## नवा मालक,नवे कुलुप


घराचा नवा मालक नेहमी घराची जुनी कुलुपेही बदलत असतो. न जाणो आधीच्या मालकाने या कुलुपाची एखादी चावी स्वत:कडे ठेवली असेल तर आपण गोत्यात येऊ, अशी भीती त्याला वाटत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाचा आता सर्व अर्थाने ताबा घेतल्यावर अमित शहा यांना अध्यक्षपद देऊन तेच केले आहे. साधनशुचितेचा आग्रह धरणारे, आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेल्याचा सार्थ अभिमान मिरवणारे आणि काँग्रेसच्या नेत्यांमध्ये सत्तेमुळे आलेल्या निबरपणावर कठोर प्रहार करणारे भारतीय जनता पक्षातले अनेक जुने जाणते नेते-कार्यकर्ते अमित शहांच्या नियुक्तीवर मनातल्या मनात अश्रू ढाळत असतील. सत्तेत भाजप आहे की नरेंद्र मोदी आहेत, या संभ्रमातून बाहेर येण्यासही भाजपच्या नेत्यांना थोडा कालावधी जावा लागेल. सरकार आणि पक्ष हे दोन्ही एकाच व्यक्तीच्या हाती असणे कामकाजासाठी सोयीचे असते, मात्र त्याचवेळी लोकशाहीत असा एकाधिकार घातकही ठरू शकतो. इंदिरा गांधी यांच्या बाबतीत देशाने हा अनुभव एकदा घेतलेला आहे. याही पलीकडे जाऊन केवळ अमित शहा यांच्याबाबतीत विचार केला, तर भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी शहा यांची नियुक्ती होणे हा तत्वाच्या राजकारणाची भाषा करणाऱ्या अनेकांवर काळाने उगवलेला सूडच आहे. 'एखाद्याचा गुन्हा शाबीत होत नाही, तोवर त्याला गुन्हेगार म्हणू नये', या तत्वाला तिलांजली देऊन भाजपने अनेकदा काँग्रेसच्या नेत्यांवर टीका केली आहे, आता बहुधा त्याच युक्तिवादाचा आधार भाजपही घेईल. गुजरातमधील एका वादग्रस्त प्रकरणात त्यांचे नाव जोडले गेले होते. त्यानंतर शहा अनेक महिने भूमिगत झाले होते. २०१० साली त्यांना तीन महिने तुरुंगात काढावे लागले होते. त्यांना काही काळ गुजरातमध्ये प्रवेशबंदीही होती. अर्थात यातील एकही आरोप सिद्ध झालेला नाही आणि 'हे सर्व आरोप राजकीय सूडबुद्धीने केलेले होते', या नेहमीच्या युक्तिवादावर काही केवळ काँग्रेसची मक्तेदारी नाही. भाजपलाही तो वापरण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र, हरयाणा आणि झारखंड या तीन राज्यांमध्ये आता विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. यापैकी झारखंड वगळता दोन्ही राज्यांमध्ये काँग्रसचे सरकार आहे आणि तिथे कमळ फुलविण्याची जबाबदारी हे पक्षाध्यक्ष या नात्याने शाह यांच्याकडे येणारे पहिले काम असेल. १९८२ साली पहिल्यांदा भेट झाल्यापासून सतत मोदी यांची सावली होऊन राहिलेले अमित शहा हे मोदी यांच्या प्रत्येक मिशनमधील महत्वाचे प्यादे आहेत. या प्याद्याने त्यांना उत्तरप्रदेशात लोकसभेच्या ८० पैकी ७१ जागा मिळवून दिल्या. सरकारवर मांड पक्की ठेवण्यासाठी मोदी यांनी पक्षाचा लगाम आपल्या याच 'सावली'कडे आता दिला आहे.

**दखल** dakhal.mtonline.in

## सहनशक्तीच संपली?

वाढदिवसाचा आनंद मित्रांसोबत साजरा करून घरी परतणाऱ्या २८ वर्षांच्या संदीप दबडेला त्याची परतीची वाट थेट आयसीयूमध्ये घेऊन जाईल, याची सूतरामही कल्पना नव्हती. खासगी मोटार कंपनीत काम करणारा, उत्तम क्रिकेटपटू असलेला संदीप घरखर्चाला हातभार लावण्यासाठी रात्री अर्धवेळ काम करतो. तो राहात असलेल्या इमारतीत तळमजल्याला भंगाराचा व्यवसाय करणारा राकेश यादवही बऱ्यापैकी कमावणारा. यादवचा कुत्रा संदीपवर भुंकला, कुत्र्याला हटकण्याची 'हिंमत' करणाऱ्या संदीपबरोबर कुत्र्याच्या मालकाची वादावादी झाली, चिडलेल्या मालकाने संदीपच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला, संदीप आता हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये उपचार घेत आहे.

क्षुल्लक कारणावरुन जीवघेणा हल्ला झाल्याची मुंबईतील ही काही पहिलीच घटना नाही. खासकरून सुस्थापित समाजात अशा हिंसेच्या घटना वाढतच आहेत.



दारू पिऊन घरी जात असलेल्या दारुड्याने मुलाची सायकल पाडली म्हणून वादावादी झाल्यानंतर वाद घालणाऱ्या ५७ वर्षांच्या महिलेच्या डोक्यात दारुड्याने कुऱ्हाडीने घातलेला घाव, करीरोडच्या गोदरेज मैदानात एका मुलाने दुसऱ्या मुलाला टक लावून का पाहतो, असा जाब विचारल्याने जबर मारहाणीत झालेला एका २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू असे अनेक प्रकार मुंबईत अलीकडे घडलेत. देशात हिंसक हल्ल्यांमध्ये वर्षागणिक वाढ होत असून बिहार, उत्तर प्रदेशपाठोपाठ महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे, अशी नोंद नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या २०१३च्या गुन्हे अहवालात आहे. महाराष्ट्रात २०१३ साली अशा क्षुल्लक कारणांवरुन २५१२ हत्या झाल्या, तर २४२८ व्यक्ती अशा हल्ल्यांमध्ये जखमी झाल्या. या हल्ल्यांमध्ये लहान मुलांनाही लक्ष्य केले गेले आहे. अवघ्या दशकभरापूर्वी हिंसेच्या मुळाशी दारूसाठी पैसे न मिळणे, हुंडा, पैसे परत न करणे अशी आर्थिक कारणे असत परंतु, आता टीव्हीवर हवी ती मालिका पाहू दिली नाही इथपासून रागाने पाहणे, गाडीला धक्का लागणे, आवारात कचरा टाकणे अशा किरकोळ बाबींवरूनही हातघाईला येण्याचे प्रमाण लक्षणीय वाढत आहे. महानगरात जगण्यासाठी वाढत असलेली पराकोटीची स्पर्धा, संघर्ष, त्यातून येणारे कमालीचे नैराश्य आणि सहनशक्तीचा होत असलेला लोप यातच या हल्ल्यांचे मूळ आहे. शहरातील नागरिकांचा बदलता सामाजिक आणि आर्थिक स्तरही याला कारणीभूत आहे. नैराश्य आणि सहनशक्तीच्या सीमेचा कडेलोट होण्यास एखादी ठिणगी पुरेशी ठरते व मनात धुमसणाऱ्या संतापाचा स्फोट होतो. दुसऱ्याच्या चुकांना माफ करत निर्मळ वृत्तीने जगणे तर अगदी आदर्शवत वाटते. त्यामुळेच शहरातील नागरिकांत धुमसणाऱ्या स्टेटस सिम्बॉलरूपी ज्वालामुखींना आवर कसा घालायचा, हा आता यक्षप्रश्न आहे.

**अनुराग कांबळे** (मुंबई)

# धनगर आरक्षण: वस्तुस्थिती व राजकारण

**डॉ. भौमिक देशमुख**
**रवींद्र तळपे**

धनगर समाजाचा अनुसूचित जमातींच्या (आदिवासी) यादीत समावेश करण्यासंबंधीचा धुरळा पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर उडाला आहे. पार्श्वभूमी अर्थातच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची आहे. याला प्रतिक्रिया म्हणून राज्यातील सर्व आदिवासी आमदारांनी राज्यपालांची भेट घेऊन यासंबंधीचा प्रस्ताव केंद्राकडे न पाठवण्यासंबंधीचे निवेदन दिले. प्रसंगी आपापल्या पदांचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविली आहे.

वास्तविक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२खाली महाराष्ट्र राज्य क्षेत्रासंबंधी सप्टेंबर १९५० रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सूचिबद्ध केलेल्या आहेत. त्यामध्ये धनगर अशी नोंद नाही. संविधान (अनुसूचित जमाती) आदेश १९५० अन्वये मुंबई प्रांतासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीत ओरॉन, धनगड जमातीचा उल्लेख नाही. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या यादीत Oraon, including Dhanka and Dhangad अशी नोंद आहे. मुंबई राज्य पुनर्रचना कायदा, १९६०अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या सूचीमध्ये Oraon, including Dhanka and Dhangad अशी नोंद केलेली होती, आणि यासाठी अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तहसली, चांदा जिल्ह्यातील गडचिरोली आणि सिरोंचा तहसील, यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर, वणी आणि यवतमाळ तहसील हे क्षेत्र निर्धारित करण्यात आलेले होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीत धनगर, ओरॉन, धनगड अशी नोंद करण्यात आली आहे. उपसचिव, समाजकल्याण यांनी १२ जून १९७९ रोजी धनगर जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याकरिता केंद्र शासनास शिफारस केलेली होती. तथापि एखाद्या जातीचा/ समाजाचा, अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरिता निकष निर्धारीत केलेले आहेत. ते निकष धनगर जात पूर्ण करीत नसल्याने समाजकल्याण विभागाने केलेली शिफारस पुनर्विचाराअंती मागे घेण्यात आली आहे.



> अनेक प्रकारच्या संशोधनांअंती घटना समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात धनगर या जातीचा समावेश भटक्या जमातींत केला गेला आहे. अनुसूचित जमातींच्या यादीत असलेल्या 'धनगड' या जातीची वैशिष्ट्ये 'धनगर' या जातीशी जुळत नाहीत. तरीही मुद्रणछपाईच्या चुकीचा मुद्दा उपस्थित करून दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १९६७मधील निर्णयानुसार धनगर या जातीचा समावेश महाराष्ट्राच्या इतर मागासवर्गाच्या यादीत करण्यात आला. सद्यस्थितीत, महाराष्ट्र राज्यातील धनगर ही एक प्रमुख जात आहे आणि तिचा महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमातीच्या यादीत समावेश असून संबंधित लाभ अनुज्ञेय आहेत. तसेच, महाराष्ट्र राज्यात भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) साठी ३.५ टक्के इतके आरक्षण सध्या देण्यात येते. तर, १ कोटी ५ लाख लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातींच्या यादीत सद्यस्थितीत एकूण ४५ अनुसूचित जमातींचा समावेश असून त्यांना एकूण ७ टक्के इतके आरक्षण लागू आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसू चित जमातींच्या यादीत धनगर, ओरॉन, धनगड अशी नोंद करण्यात आली आहे. नामसदृश्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीसाठी शासनाने देऊ केलेल्या सवलती घेणाऱ्या बोगस आदिवासींच्या संख्येत १९७६ नंतर मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे जनगणनेच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात ओरॉन, धनगड या जमातींची संख्याही वरखाली झाली आहे.

महाराष्ट्रामधील धनगर ही 'भटक्या जमाती- क'च्या यादीमध्ये समाविष्ट असलेली जात व ओरॉन, धनगड ही अनुसू चित जमातींच्या यादीमध्ये समाविष्ट असलेली जमात या भिन्न जाती आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती जमाती सुधारीत आदेश, २००२ अन्वये महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगड राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये Oraon (ओरॉन) ची तत्सम जमात म्हणून नमूद केलेली Dhangad (धांगड) ही नोंद बरोबर आहे. केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालयाने महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या यादीत ३६ क्रमांकावर असलेली धांगड ही ओरानची उपजमात असून शेती हा त्यांचा व्यवसाय आहे, तर मेंढी व गुरांचे पालन हा धनगरांचा व्यवसाय असल्याचे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील धनगर समाजाचा समावेश भटक्या विमुक्त जातीत करण्यात आल्याने ही प्रिंटिंग मिस्टेक नसल्याचे स्पष्ट केले आहे.

जाती , जमातींची नावे व त्यांच्या वैशिष्ट्यांबाबत राज्यघटनेच्या मसुदा समितीमध्ये झालेल्या चर्चेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे स्पष्टपणे म्हणाले होते की, 'नामसदृश जाती किंवा जमातींना मूळ जाती-जमातींच्या सवलती मिळणार नाहीत. त्याचप्रमाणे एका राज्यातील लाभार्थी जात किंवा जमात दुसऱ्या राज्यात लाभार्थी जात किंवा जमात असेलच असे नाही, किंबहुना ती नसणारच.' म्हणून शुद्धलेखनातील चुका काढणे म्हणजे भारतीय राज्यघटना आणि घटनासमितीलाच आव्हान देणे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १२ जुलै २००५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयान्वये कार्यान्वित संशोधन पथकाने आपल्या सर्वेक्षण अहवालात असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यातील धनगर (Dhangar) जातीच्या चालीरीती, रूढी, परंपरा, देवदेवता व पारंपारिक व्यवसाय हा धांगड (Dhangad) जमातीपेक्षा भिन्न असून या दोन्ही जाती जमाती एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयानेही रिट क्र. ४०४६६२/२००९ मध्ये निकाल देताना महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत सर्वंकष विचार केला आहे.

महाराष्ट्र शासन विरुद्ध मिलिंद कटवारे व इतर या विशेष अनुज्ञा याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ नोव्हेंबर २०००मध्ये अंतिम निर्णय देताना राष्ट्रपतींनी जाहीर केलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये शासनास कुठल्याही न्यायालयास व इतर कोणत्याही प्राधिकाऱ्यास कोणताही बदल/ सुधारणा करण्याचे अधिकार नसल्याचे निरीक्षण केलेले आहे. राज्यघटनेच्या कलम ३४२ (१) नुसार अनुसूचित जमातींच्या यादीत एखाद्या जमातीचा समावेश करणे किंवा वगळणे हा अधिकार फक्त संसदेला आहे.

**दृष्टिक्षेप**




भारतात आज किमान ८ कोटी बेघर

किमान ९ कोटी १० लाख घरांची तातडीने आवश्यकता

ग्रामीण भारतात सध्या १६ कोटी ७८ लाख घरे


शहरी भारतात सध्या ७ कोटी ८८ लाख घरे

ग्रामीण व शहरी भारतात ३७ टक्के घरे एका खोलीची

७० टक्के ग्रामीण घरे आजही स्वच्छतागृहे नसणारी

देशात झोपडपट्ट्यांमध्ये १० कोटींचे वास्तव

# उद्याच्या किरणांवर विश्वास हवा



**सगुण-निर्गुण**

*माणसा शक्यतो तू चालत रहा*
*चालत रहाणं हा तुझा धर्म आहे*
*आणि तुझ्या पायांना जमीन पुरवणं हा*
*पृथ्वीचा धर्म आहे.*

माझ्या एका कवितेची सुरुवात वरील ओळींनी केली आहे. माणसा तू चालत रहा. प्रगतीचे पंख लेवून झेपावत रहा. प्रगतीच्या नव्या वाटा शोधत रहा. सतत पुढे जात रहा कारण चालत रहाणं तुझा धर्म आहे. म्हणजे गुणधर्म आहे.

तुझ्या चालत्या पायांना जमीन देणं, रस्ते देणं, तुझ्या पायांना आधार देणं, तुला सांभाळत पुढे नेणं हा पृथ्वीचा गुणधर्म आहे त्यामुळे गतिमान होऊन चालत राहिले पाहिजे.

जन्माला आल्यापासुन आशा-निराशेच्या हिंदोळ्यांवर आपण झुलत असतो. सुख दु:खाच्या पाठ शिवणीला पुरून उरतो. आपण सतत आशावादी राहिले पाहिजे. निसर्ग हा परिवर्तनशील आणि गतिमान आहे. ऋतुंचे सोहळे अनुभवाला मिळतात. झाडांची पानगळ संपून नवीन पालवी लकाकत असते. उद्याचा दिवस नव्या आशा-आकांक्षा घेऊन येतो. सूर्य पुन्हा आपल्या किरणांनी सृष्टीला चैतन्यमय करतो.

पावसाळ्यात नद्या वाहू लागतात. नवनव्या कळ्या उमलून फुलांच्या रंगीन दुनियेत हरखून जातो. वारा वाहत असतो. त्याची हळवी झुळूक तनामनाला सुखावून जाते. यामुळे आपले जगणे उत्साही, आनंदी व चैतन्यमय होते. त्यामुळे चालत राहिले पाहिजे. थांबला तो संपला. जो बसला तो बसून जातो. आळस हा माणसाच्या पायातल्या बेड्या ठरतो.

नदी वाहण्याचे थांबवते तेव्हा तिचे डबके होते आणि तिचे नदीपण हरवून जाते. पक्षांचा किलबिलाट थांबला तर जगण्याला ग्रहण लागेल. त्यामुळे स्वत:वर भरपूर प्रेम करुन आशावादी दृष्टीने, अंगभर उत्साह भरून जगले पाहिजे. स्वत:वर प्रेम करणारा मग जगावरही प्रेम करू लागतो. 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या पाडगावकरांच्या कवितेची यथार्थता पटते.

वेदामधले एक सुत्र आहे. 'चरैवेती चरैवेती' म्हणजे पुढे चालत रहा, चालत रहा. किती सुंदर सूत्र आहे! आदिमानवापासून सुरु झालेला माणसाचा प्रवास आजच्या औद्योगिक आणि वैज्ञानिक युगापर्यंतच्या कालखंडापर्यंत किती विस्मयकारक, प्रगतीकारक झाला आहे हे आपण पहात आहोतच.

मानवाचा हा प्रवाह सातत्याने नव नव्या गोष्टींचा शोध घेत आला आहे. मानवी जीवन सुखकारक होईल यासाठी धडपडत आहे. मानवी प्रवाह गतीमान आहे तसा तो परिवर्तनशील पण झाला आहे.

व्यक्तिगत जीवनातही गतिमानता, परिवर्तनशीलता हवी. उद्याच्या उगवत्या सूर्याच्या प्रफुल्लीत करणाऱ्या किरणांवर विश्वास हवा. आळस, निराशा, निरुत्साह सोडून आनंदाने उद्याला सामोरे जायला हवे.

जीवन आनंदाचे गाणे होण्यासाठी चालत राहिले पाहिजे. प्रगतीकडे झेपावले पाहिजे.

**-प्रभाकर कुलकर्णी**

**बहुतांची अंतरे** mtantare@gmail.com

### दरी तर वाढली आहे



'नवा रेषावातरी खेळ' ह्या समर्पक आणि कठोर शब्दांतील संपादकीयाबद्दल त्रिवार अभिनंदन! आपल्याकडे गेली काही वर्षे गरिबी रेषा हा एक विनोदाचाच भाग झाला आहे. सर्वत्र 'आहे रे' आणि 'नाही रे' मधली दरी प्रचंड वाढलेली दिसत असूनही गरिबी रेषा ठरवत असताना मात्र राज्यकर्ते देशात किमान गरिबी दिसेल याची काळजी घेताना दिसतात. जागोजाग माणसांचे लोंढे कामाची वाट पाहताना दिसतात आणि दिवसान्ती रिकाम्या हाताने घरी जातात म्हणजे देशात गरिबी आहे.

**माया भाटकर** चारकोप गाव

### कायदा काय आहे?

मी दररोज डोंबिवली ते भिवंडी व्हाया ठाणे असा प्रवास करतो, डोंबिवलीहून ५ कि.मी.वर कटाई टोल नाका आहे. तिथून पुढे १० कि.मी.वर मुंब्रा बायपासला दुसरा टोल नाका लागतो. त्यापुढे ८ कि.मी.वर खारेगाव टोल नाका लागतो. पुढे ६ कि.मी.वर काशेली टोल नाका लागतो. म्हणजे २९ कि.मी. प्रवास करण्यासाठी रोज मला ११० रुपये येताना आणि ११० रुपये जाताना द्यावे लागतात. नक्की काय कायदा आहे? ही तर सरळ सरळ लूट आहे. पहिले ६५ आणि आत्ता ४४ कोणते नाके बंद केले, त्याची यादी कळेल का? राजसाहेब ह्या विषयावर का आक्रमक नाही होत?

**मिलिंद खातु,** डोंबिवली

### चिंताजनक वास्तव

खासगी रुग्णालयातील सिझेरियनबद्दलची बातमी आणि त्याबद्दलची आकडेवारी चिंताजनक आहे. गर्भधारणा झाल्यापासून दिवसेंदिवस बाळाची होणारी वाढ, त्याचे वजन, त्याची हालचाल, त्याचे विकसित होणारे अवयव, त्याची गर्भातील स्थिती अशा सर्व बारीकसारीक गोष्टी नवीन तंत्रज्ञानाने डॉक्टरांना आगाऊ कळत असतात. इतकी वैज्ञानिक प्रगती होऊनही नऊ महिन्यानंतर होणारी प्रसुती नैसर्गिक होऊ शकत नाही ही भयानक गोष्ट आहे. दुसरे, गर्भधारणा झाल्यानंतर गर्भवतीला घरातून पौष्टिक खुराक सुरू होतो. त्यात खासगी डॉक्टरांकडून त्यांना देण्यात येणारी औषधे, यामुळे बाळाचे वाढणारे वजनही सिझेरियनकडे नेत असावे.

**-विलास लक्ष्मण कोंडविलकर,** चारकोप.

### डॉक्टरांचा स्वार्थ हेच मूळ

दिनांक ८ जुलै रोजी 'सिझेरियनची कळ वाढती' हा शर्मिला कलगुटकर यांचा वृत्तांत वाचला. डॉ. धुरु शहा यांनी महिलांच्या संयमाबाबतीत दिलेली माहिती ही कपोलकल्पित असून बहुतांश डॉक्टरांचा स्वार्थ हेच या दिवसेंदिवस वाढणाऱ्या सिझेरियन प्रसुतींचे मूळ कारण आहे. जिथे सामान्य प्रसुतीला खाजगी हॉस्पिटलमध्ये अंदाजे १५ हजार रुपये खर्च येतो, तिथे सिझेरियनसाठी ५० हजार ते ७५ हजार रुपये आकारले जातात. डिलिव्हरीसाठी आलेल्या महिलांच्या प्रसुतीकळा बंद करून, कुटुंबियांना बाळाच्या व आईच्या जिवाला संभाव्य धोका असल्याची भीती दाखवतात व संमतीपत्रे घेतात. हा गेली कित्येक वर्षे चाललेला धंदा अव्याहत सुरू आहे. अर्थात काही मध्य-उच्च वर्गातील कुटुंबे मुहूर्त पाहून प्रसुती करवतात किंवा काही महिला प्रसुतीनंतरचा शरीराचा बेढबपणा टाळण्यासाठी ऑपरेशनद्वारे प्रसुती करुन घेतात. पण याचे प्रमाण नगण्य आहे.

**- अविनाश नाईक,** वाकोला-सांताक्रूझ

### डॉ. दाभोलकरांची मरणोत्तर हत्या

पोलिस आयुक्तांनी प्लँचेट करून दाभोलकरांच्या आत्म्याशी संवाद (?) साधण्याचा खटाटोप केला होता, असा गौप्यस्फोट एका नियतकालिकाने केल्याचे वृत्त (८ जुलै) वाचले. असे झाले असेल, तर ही डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांची सरकारने मरणोत्तर केलेली हत्या आहे असे म्हणायला हवे. अंधश्रद्धेचे निर्मूलन खेड्यापाड्यात नव्हे, तर शासनापासून सुशिक्षित समाजात करण्याची गरज आहे हेच यावरून दिसते. म.गांधीजींच्या हत्येनंतर त्यांच्या विचारांची हत्या करण्याचे प्रयत्न राजकारणी आणि सुशिक्षित वर्गाकडून सतत होत असतात. मात्र सशक्त विचारसरणी ही कधीही संपूर्णपणे नष्ट होत नाही.



**-प्रमोद तावडे,** डोंबिवली

### विज्ञानवादाचा फोलपणा

पुणे पोलिसांनी दाभोलकरांच्या आत्म्याशी संवाद साधला ही बातमी वाचून हसू तर आलेच, पण अंधश्रद्धा निर्मूलन समितीवाल्यांची कीवही आली. कीव याच्यासाठी की, दाभोलकरांच्या हत्येच्या तपासासाठी ज्या गोष्टीवर त्यांचा अजिबात विश्वास नाही त्याच गोष्टीचा शेवटी आधार नाइलाजाने घ्यावा लागत आहे. अंनिसवाल्यांना पोलिसांकडून मिळालेला हा 'धडा' आहे. भुतांच्या संदर्भात संशोधन करणारी जवळपास ५० कोटी संकेतस्थळे आहेत. विदेशात भुतांविषयी विपुल प्रमाणात संशोधन झालेले आहे. पुणे पोलिसांच्या या कृतीमुळे डॉ. दाभोलकर सांगत असलेला विज्ञानवादाचा फोलपणा समाजासमोर आला, हे महत्त्वाचे !

**अरविंद दि. तापकिरे,** चारकोप

**धावते जग**



## ब्राझिल 'उद्ध्वस्त'!

वर्ल्डकप फुटबॉल स्पर्धेतील मंगळवारची रात्र समस्त फुटबॉलप्रेमी कधीच विसरू शकणार नाहीत! जर्मनीच्या धडाक्यापुढे ब्राझिलचा ७-१ असा 'ऐतिहासिक' धुव्वा उडाला. विक्रमी सहाव्यांदा वर्ल्डकप जिंकण्याचे स्वप्नच नव्हे, तर ब्राझिलच्या फुटबॉललौकिकाच्या देखील ठिकऱ्या उडाल्या. ब्राझिल म्हणजे फुटबॉल, असे समीकरण आतापर्यंत संपूर्ण जगाला ठाऊक होते. त्यामुळेच ब्राझिलमध्ये वर्ल्डकपचे आयोजन म्हणजे फुटबॉलच्या पंढरीत वर्ल्डकपची वारी, कौशल्यपूर्ण फुटबॉल आणि सांबा मॅजिकच्या तालावर उत्तरोत्तर रंगणारी स्पर्धा, असे चित्र रंगविले जात होते. बहुतांशी ते खरेदेखील ठरले. स्पेन, इटली-इंग्लंड, उरुग्वे या माजी विजेत्यांना स्पर्धेबाहेर फेकत फारशा परिचित नसलेले संघ आणि खेळाडूंनी बाद फेरीत मुसंडी मारली. व्यक्तिगत कौशल्याला सांघिक निर्धाराची जोड देत चिली, कोस्टारिका, अमेरिका, ग्रीस, कोलंबिया आदी संघांनी ब्राझिलचे मैदान गाजविले. मात्र, उपांत्य फेरीत ब्राझिल विरुद्ध जर्मनी आणि अर्जेंटिना विरुद्ध हॉलंड अशा तुल्यबळ संघांमधील लढतच निश्चित झाली. वास्तविक, पहिल्या सामन्यापासूनच ब्राझिलचा संघ फारसा लयीत नव्हता. पेले, सॉक्रेटिस-झिको, रोनाल्डो-रोनाल्डिन्हो-काका या परिचित खेळाडूंनी दाखविलेल्या जादुई खेळाचा करिष्मा यंदाच्या स्पर्धेत खेळणारी ब्राझिलियन टीम अभावानेच दाखवू शकली. किंबहुना, त्यांचा स्पर्धेचा श्रीगणेशाच 'सेल्फगोल'ने झाला. बाद फेरीत चिलीविरुद्ध पेनल्टी शूटआऊटपर्यंत लढत द्यावी लागली. त्याच ठिकाणी ब्राझिलियन समर्थकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती. त्यातच स्टार स्ट्रायकर नेमार हा जायबंदी झाला, तर कर्णधार थिएगो सिल्वा याला दुसरे 'यलो कार्ड' दाखविण्यात आल्याने उपांत्य सामन्याला मुकावे लागले. यंदाच्या ब्राझिलच्या संघात नेमारव्यतिरिक्त इतर खेळाडू अभावानेच छाप पाडू शकले. अशा परिस्थितीत बलाढ्य जर्मनीचा मुकाबला करण्यापूर्वीच खच्ची झालेला ब्राझिलियन संघ सावरू शकलाच नाही. दुसरीकडे, जर्मनीने एखाद्या मशिनप्रमाणे खेळ करीत यंदाच्या स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी केली आहे. सुपरस्टार रोनाल्डोच्या नेतृत्वाखालील पोर्तुगालचा पहिल्याच सामन्यात ४-० असा धुव्वा उडवित स्पर्धेला शानदार प्रारंभ केला. सलग चौथ्या वर्ल्डकपमध्ये उपांत्य फेरी गाठण्याचा विक्रम केला. वर्ल्डकपमध्ये विक्रमी सोळा गोल करणारा मिरोस्लाव्ह क्लोज, गेल्या स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारा थॉमस म्युलर असे स्टार असूनही संघ म्हणून शिस्तबद्ध कामगिरी करण्याची खबरदारी त्यांनी घेतली आहे. आता अंतिम फेरीत अर्जेंटिना वा हॉलंड यांच्यापैकी कोणत्याही संघाशी मुकाबला असला, तरी वर्ल्डकप उंचाविण्यासाठी जर्मनीच फेव्हरिट असतील!



## चोरीच्या काट्याचा नायटा

भारतीय जनता पक्षाचे बिहारमधील खासदार गिरीराज सिंह यांनी पोलिसांकडे पाटण्यातील आपल्या घरातून केवळ ५० हजारांची चोरी झाल्याची तक्रार गुदरली होती. खासदाराच्या घरची चोरी असल्याने पोलिसांनी नेकीने आणि वेगाने तपास केला. मात्र, त्यांना अवघ्या ५० हजारांच्या चोरीचा शोध घेताना जवळपास दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल हाती लागला. गिरीराज सिंह यांच्या नोकरांपैकी चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. 'महादेवा, मला सोन्याची कुऱ्हाड नको. चांदीचीही नको. माझी लोखंडाची कुऱ्हाड विहिरीत पडली आहे. ती तेवढी मला दे..' असे प्रामाणिकपणे शंकर-पार्वतीला सांगणाऱ्या लाकूडतोड्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यानंतर, त्या तोलामोलाची कथा आज इतक्या काळाने कलियुगात घडते आहे. खासदार गिरीराज सिंह आपल्या घरातून केवळ ५० हजार रुपये चोरीला गेल्याचे म्हणत आहेत. पोलिसांना मात्र एक कोटी १४ लाखांची रोकड, ६०० डॉलर, सोन्याच्या साखळ्या, सोन्याचे अलंकार, चांदीची नाणी, किमती मनगटी घड्याळे असे घबाडच चोरांकडे सापडले आहे. गोष्टीतल्या प्रामाणिक लाकूडतोड्यावर प्रसन्न होऊन शंकर-पार्वतीने किमती धातूंच्या कुऱ्हाडीही त्यालाच देऊन टाकल्या. आताही जवळपास सत्ययुग अवतरले असल्याने बिहारचे पोलिस गिरीराज सिंह यांच्या प्रामाणिकपणावर प्रसन्न होऊन त्यांना हा सारा मुद्देमाल बक्षीस म्हणून देऊन टाकतील, यात शंका नाही. बिहार विधान परिषदेचे सभासद असणारे गिरीराज सिंह मोदीलाटेत लोकसभेवर निवडून आले आहेत. मात्र, लोकसभेच्या प्रचारमोहिमेत त्यांचा तोल इतका ढळला होता की, 'मोदी यांना विरोध करायचा असेल तर सरळ पाकिस्तानात चालते व्हा' अशा गर्जना त्यांनी केल्या होत्या. लोकशाहीतील विरोधक आणि भूमिका यांच्याबद्दल ज्यांचे आकलन इतके कोते आणि दुष्टाव्याचे आहे; त्यांनी इतरांना पाण्यात पाहताना निदान स्वत:चे चारित्र्य शुद्ध ठेवायला हरकत नव्हती. ते त्यांच्या कपाळावरील टिळ्याला शोभून दिसले असते. गिरीराज सिंह यांच्यासारखी उपद्रवी माणसे नव्या केंद्र सरकारच्या अस्तनीतील निखारे ठरण्याची शक्यता आहे. बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन मोठ्या राज्यांमध्ये उमेदवारांची निवडून येण्याची क्षमता हाच अलिकडच्या काळातील निर्णायक घटक ठरतो आहे. त्यामुळे, सर्व पक्षांमध्ये बाहुबली, गुन्हेगार आणि बेताल राजकारणी सारख्याच प्रमाणात वाटले गेले आहेत. सिंह यांनी इतकी मालमत्ता कुठून आणली, याचे उत्तर जनतेला द्यावे, अशी मागणी नीतिशकुमार यांच्या जनता दलाने केली आहे. ती बरोबरच आहे. प्राप्तिकर खात्यानेही सिंह यांना नोटीस धाडली आहे. मात्र, हे प्रकरण कितपत तडीला जाते, हे लवकरच समजेल.